# तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, पुणे

४१२ ई, शिवाजी नगर, बहिरट पाटील चौक, पुणे - ४११ ०१६

दूरध्वनी / फॅक्स क्र. (०२०) २५६५६२३४ E-Mail: ropune.dte@gmail.com


**कालमर्यादा : दि. ३०.१०.२०१० त्वरीत :**

जा.क्र. विकापु/लले/राशिपु १०-११/२०१०/ ६६६३ दिनांक - २७.१०.२०१०

27 OCT 2010

प्रति

सर्व प्राचार्य
शासकीय / अशासकीय अनुदानित व विनाअनुदानित
अभियांत्रिकी / औषधनिर्माणशास्त्र / वास्तुशास्त्र महाविद्यालये /
तंत्रनिकेतने व तत्सम संस्था

विषय :- राज्य शिक्षक पुरस्कार २०१० - २०११

संदर्भ :- १) उच्च व तंत्रशिक्षण विभागाचा शासन निर्णय क्र. शिरापु २००८/(१७७/०८)/ समन्वय दिनांक १६.०२.२०१०

२) महाराष्ट्र शासन पत्र क्र. संकीर्ण-२०१०/(१९९/१०)/समन्वय दि. १९.१०.२०१०

३) मा. संचालक, तंत्रशिक्षण, मुंबई यांचे पत्र क्र. ४अ/आस्था/शिरापु/ २०१०-११/शा.१९०२ दिनांक - २१.१०.२०१०.

**सन २०१० - २०११** या वर्षासाठी तंत्रशिक्षण क्षेत्रातील शिक्षकांना राज्य शिक्षक पुरस्कार जाहीर करणे शासनाच्या विचाराधीन आहे. त्या अनुषंगाने शासनास त्वरीत माहिती सादर करावयाची आहे.

उपरोक्त संदर्भ क्रमांक एकच्या शासन निर्णयान्वये राज्य शिक्षक पुरस्कारासाठी सुधारीत निकष, नियम व पात्रता प्रसिध्द करण्यात आले आहेत, त्यांचे अवलोकन करावे. उपरोक्त संदर्भ क्रमांक दोनच्या पत्रासोबतच्या सुधारीत विवरणपत्राची प्रत जोडली आहे, त्यानुसार उलट टपाली माहिती या कार्यालयास सादर करणे अत्यावश्यक आहे.

उपरोक्त संदर्भाधीन संबंधित शासन निर्णय व शासन पत्रे तंत्रशिक्षण संचालनालयाच्या संकेतस्थळावर उपलब्ध आहेत.

तंत्रशिक्षण संचालनालयाच्या सूचनांप्रमाणे आवश्यक त्या सर्व संबंधित कागदपत्रांसह आपल्या संस्थेची माहिती विहीत विवरणपत्रात विनाविलंब **दिनांक ३०.१०.२०१० पर्यंत** या कार्यालयास **प्रत्येकी तीन प्रतीत** सादर करावी. संस्थेची सदर माहिती 'निरंक' असल्यास तसेही त्वरीत कळवावे. उशीरा प्राप्त झालेली व अपुरी माहिती विचारात घेतली जाणार नाही, याची कृपया नोंद घ्यावी.

सहसंचालकांकरीता
तंत्रशिक्षण, वि. का. पुणे

प्रत माहिती व योग्य कार्यवाहीसाठी :
प्रोग्रॅमर, तंत्रशिक्षण, विभागीय कार्यालय, पुणे
त्यांना सूचित करण्यात येते की, उपरोक्त पत्र या कार्यालयाच्या संकेतस्थळावर त्वरीत प्रसिध्द करावे.